# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 07/04/2023 (शुक्रवार) दुपार

---

### घरफोडी

पो.स्टे. सावनेर :— अंतर्गत बोरगाव येथे दिनांक ०६/०४/२०२३ चे रात्री ०१.०० वा. ते ०७.०० वा. दरम्यान फिर्यादी नामे— श्रीमती बहिणबाई नारायण खडसे, वय ७० वर्ष, रा. बोरगाव ही रात्री घरी हजर नसल्याने कोणीतरी अज्ञात चोराने घराचे समोरील दाराचे कुलुप खोलुन आत प्रवेश करून घराचे किचन रूम मध्ये असलेले लोखंडी कपाटातील लॉकर तोडुन त्यामधील एक जुनी सोन्याची मोठी पोत १० ग्रॅम किंमती अंदाजे १००००/— रूपये तसेच जुने अर्धा तोळयाची सोन्याची बदामी अंगठी किमंती अंदाजे ५०००/— रू, तसेच ५०० रूपयाचे ६० नोटा ३००००/—रू. असा एकुण ४५०००/— रूपयाचा मुद्देमाल चोरून नेला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. सावनेर येथे आरोपीविरुध्द कलम ४५७, ३८० भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार पांडे मो. नं. ७९७२४३१२३८ हे करीत आहे.

### बॅटरी चोरी

पो.स्टे. कळमेश्वर :— अंतर्गत ०९ कि.मी. अंतरावरील मौजा उबाळी ते म्हसेपठार येथे दिनांक ०६/०४/२०२३ चे ००/४३ ते ०१/२५ वा. दरम्यान फिर्यादी नामे— दिलीप श्रीकृष्णराव वाघाये, वय ३८ वर्ष रा. वार्ड क्र. १५ कळमेश्वर हा रिलायंस जिओ कंपनिचे टेकनिशिअन असुन फिर्यादी हा घरी हजर असता त्याला नागपुर ऑफिस मधुन अलाराम कॉल आला व माहीती पडले कि उबाळी येथील कंपनिचे डोअर ओपन झाले आहे फिर्यादीने लगेच उबाळी येथे जावुन पाहीले असता पोज लाईट १०० ए एच कंपनीच्या दोन बॅटरी तसेच म्हसेपठार येथील ०३ बॅटरी कोणीतरी अज्ञात चोराने चोरून नेले आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. कळमेश्वर येथे आरोपीविरुध्द कलम ३७९ भादवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास सफौ. मन्नान नौरगाबादे ब. नं. १०४ पोस्टे कळमेश्वर हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**